राज्यातील चारही कृषि विद्यापीठांतर्गत भारतीय कृषि अनुसंधान परिषद अर्थसहाय्यित योनांकरीता राज्य शासनाचा २५% धिनी या बाबींसाठी आवश्यक अनुदान अर्थसंकल्पीत करण्यासाठी स्वतंत्र लेखाशिर्ष उघडण्यास मान्यता देण्याबाबत. (कार्यक्रमांतर्गत)

महाराष्ट्र शासन
कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग,
शासन निर्णय क्रमांक : कृषिवि-३७१७/प्र. क्र. १२६ -७/अे
मदाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय विस्तार, मुंबई-४०० ०३२,
दिनांक : ०५ डिसेंबर, २०१७.

प्रस्तावना :-

भारतीय कृषि अनुसंधान परिषद अर्थसहाय्यित योजनांकरीता ICAR कडून प्राप्त झालेल्या निधीच्या तुलनेत राज्य शासनाचा २५% हिस्सा देणे बंधनकारक असल्याने त्यासाठी विद्यापीठानी मागणी केलेला संपूर्ण निधी अर्थसंकल्पीत होणे व अर्थसंकल्पीत झालेला संपूर्ण निधी वितरीत करणे आवश्यक आहे. परंतु आर्थिक वर्षाअखेर होणा-या कपातीमुळे हे शक्य होत नाही. सबब, बांधील स्वरुपाच्या बाबींसाठी निधी उपलब्ध न झाल्यामुळे विद्यापीठांकडून वारंवार निधीची मागणी होत असते. ही बाब विचारात घेऊन कृषि विद्यापीठांतर्गत भारतीय कृषि अनुसंधान परिषद अर्थसहाय्यित योजनांकरीता आवश्यक असलेले अनुदान अर्थसंकल्पीत करुन सदर अनुदान शासन स्तरावरुन चारही कृषि विद्यापीठांकडे वितरीत करण्यासाठी चार स्वतंत्र लेखाशीर्षे उघडण्याची कार्यवाही शासन स्तरावर प्रस्तावित होती.

शासन निर्णय :-

राज्यातील चारही कृषि विद्यापीठांतर्गत भारतीय कृषि अनुसंधान परिषद अर्थसहाय्यित योजनांकरीता आवश्यक असलेले अनुदान अर्थसंकल्पीत करण्यासाठी पुढीलप्रमाणे चार स्वतंत्र लेखाशीर्षे उघडण्यास मान्यता देण्यात येत आहे.

१) "मागणी क्रमांक डी-३,
२४१५ कृषि विषयक संशोधन व शिक्षण,
०१ पीक संवर्धन,
१२० इतर संस्थाना सहाय्य,
(००) (१९) भारतीय कृषि अनुसंधान परिषद अर्थसहाय्यीत योजने अंतर्गत महात्मा फुले कृषि विद्यापीठास सहायक अनुदान राज्य हिस्सा २५ टक्के
३१, सहायक अनुदान (वेतनेतर), दत्तमत (२४१५ १०८६)"

२) "मागणी क्रमांक डी-३,
२४१५ कृषि विषयक संशोधन व शिक्षण,
०१ पीक संवर्धन,
१२० इतर संस्थाना सहाय्य,
(००)(२०) भारतीय कृषि अनुसंधान परिषद अर्थसहाय्यीत योजने अंतर्गत डॉ.बाळासाहेब सवंत कोकण कृषि विद्यापीठास सहायक अनुदान राज्य हिस्सा २५ टक्के
३१, सहायक अनुदान (वेतनेतर), दत्तमत (२४१५ १०९५)"

३) "मागणी क्रमांक डी-३,
२४१५ कृषि विषयक संशोधन व शिक्षण,
०१ पीक संवर्धन,
१२० इतर संस्थाना सहाय्य,
(००) (२१) भारतीय कृषि अनुसंधान परिषद अर्थसहाय्यीत योजने अंतर्गत डॉ.पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठास सहायक अनुदान राज्य हिस्सा २५ टक्के
३१, सहायक अनुदान (वेतनेतर), दत्तमत (२४१५ ११०१)"

४) "मागणी क्रमांक डी-३,
२४१५ कृषि विषयक संशोधन व शिक्षण,
०१ पीक संवर्धन,
०२ इतर संस्थाना सहाय्य,
(००) (२२) भारतीय कृषि अनुसंधान परिषद अर्थसहाय्यीत योजने अंतर्गत वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठास सहायक अनुदान राज्य हिस्सा २५ टक्के
३१, सहायक अनुदान (वेतनेतर), दत्तमत (२४१५ १११२)"

२. नियंत्रक, चारही कृषि विद्यापीठे यांनी त्यांच्या कृषि विद्यापीठांतर्गत भारतीय कृषि अनुसंधान परिषद अर्थसहाय्यित योजनांकरीता राज्य शासनाचा २५% निधी या बाबींसाठी आवश्यक अनुदान अर्थसंकल्पीत करुन घेण्यासाठी शासनाकडे विहीत अंदाजपत्रकात मागणी करावी.

३. सदर शासन निर्णय वरीष्ठ लेखा अधिकारी / ख.वि., महालेखापाल-१, (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र, मुंबई यांचे कार्यालयाचा संदर्भ क्र.चा-१/कृ.पशुसं.डे.व.म.वि./यूओआर-७२/ २०१७-१८/६९०, दिनांक ३१/१०/२०१७ व नियाजन विभागाचा अनौपचारिक संदर्भ क्र.१०५/१४३१, दिनांक ८/९/२०१७ तसेच वित्त विभागाचा अनौपचारिक संदर्भ क्र.३३४/अर्थ-१३, दिनांक १९/११/२०१७ अन्वये प्राप्त झालेल्या मान्यतेनुसार निर्गमित करण्यांत येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध करुन देण्यात आला असून त्याचा संगणक सांकेतांक क्रमांक २०१७१२०५१६०३०५६५०१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Devappa Annappa Gavade

Digitally signed by Devappa Annappa Gavade
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Agriculture And ADF Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=eb6891ac4984581cb912dab1f553c065a5dd35da6c8e7cf4f22d8f94fa5f56d7, serialNumber=d00367c67d2ea5a7aecea40a3081cba4d043b40cc7b0ef510250b3ea4f9795d6, cn=Devappa Annappa Gavade
Date: 2017.12.05 16:08:21 +05'30'

(दे. आ. गावडे)
सहसचिव, महाराष्ट्र शासन.

प्रत,

१. महासंचालक / सल्लागार (वित्त), महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषद,
२. कुलगुरु / कुलसचिव / नियंत्रक / विद्यापीठ अभियंता, महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी,
३. कुलगुरु / कुलसचिव / नियंत्रक / विद्यापीठ अभियंता, डॉ.बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली,
४. कुलगुरु / कुलसचिव / नियंत्रक / विद्यापीठ अभियंता, डॉ.पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला,
५. कुलगुरु / कुलसचिव / नियंत्रक / विद्यापीठ अभियंता, वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी,
६. महालेखापाल, महाराष्ट्र १ / २ (लेखापरिक्षा / लेखा व अनुज्ञेयता) मुंबई / नागपूर,
७. जिल्हा कोषागार अधिकारी, अहमदनगर / उपकोषागार अधिकारी, अहमदनगर, जि. अहमदनगर,
८. जिल्हा कोषागार अधिकारी, दापोली / उपकोषागार अधिकारी, दापोली, जि. रत्नागिरी,
९. जिल्हा कोषागार अधिकारी, अकोला / उपकोषागार अधिकारी,अकोला, जि. अकोला,
१०.जिल्हा कोषागार अधिकारी, परभणी / उपकोषागार अधिकारी, परभणी, जि.परभणी,
११.मुख्य लेखा परिक्षक, स्थानिक निधी लेखा, कोकण भवन, नवी मुंबई,
१२.उप मुख्य लेखा परिक्षक (वरिष्ठ) स्थानिक निधी लेखा, कोकण भवन, नवी मुंबई,
१३.अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
१४.निवासी लेखापरिक्षा अधिकारी, मुंबई,
१५.कार्यासन (व्यय-१) वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२,
१६.कार्यासन (अर्थसंकल्प-१३) वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२,
१७.कार्यासन (१४३१), नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२,
१८. कक्ष अधिकारी २अे / ६अे, कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२,
१९.कार्यासन ७अे, कृषि व पदुम विभाग, मुंबई ४०० ०३२ (निवडनस्ती).